नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd | अंक - ४६ | Issue - 46 | वार - शुक्रवार दि. १० जुलै २०२६ | Blow- Friday Date 10 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात पावसाचा जोर ओसरणार

## १० ते २० जुलै दरम्यान पावसाचा मोठा खंड पडणार; हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांचा अंदाज



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुसळधार पावसानंतर आता राज्यात पावसाचा मोठा खंड पडणार आहे, असं पंजाबराव डख यांनी म्हटलं आहे. १० जुलै ते २० जुलै या काळात पावसाचा मोठा खंड पडणार आहे. केवळ १५ ते १७ जुलै या काळात तुरळक ठिकाणी पा-वसाची शक्यता आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवलेला आहे.

महाराष्ट्रात जुलैच्या पहिल्या आठवड्यात जोरदार पाऊस पडला. मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, नाशिक, पणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांना पावसाने अक्षरश: झोडपून काढलेलं बघायला मिळालं. राज्यातील विविध भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडला. मराठवाडा वगळता इतर ठिकाणी चांगला पाऊस झाला. पण आता पाऊस ओसरताना दिसत आहे. मुंबई, ठाण्यात आज काहीसं ऊन पडलेलं बघायला मिळालं. त्यामुळे आता परत कधी पाऊस येणार? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी याबाबत महत्त्वाचा दावा केला आहे.

मी म्हणालो होतो त्याप्रमाणे ९ जुलैला सूर्यदर्शन घडलं आहे. राज्यात उद्याचा दिवस केवळ विखुरलेल्या स्वरुपात पाऊस पडेल. नाशिक, नंदुरबार, जळगाव, धुळे या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडेल. पण राज्यात पावसाचा जोर ओसरणार आहे. ११ जुलैला राज्यभरात पा-वसाचा जोर ओसरणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, कोकण पट्ट्यातील घाट माथ्यावरुन पाऊस ओसरणार आहे. ११ जुसैपासून राज्यात ऊन पडणार आहे. हवामान कोरडं राहणार आहे, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे.

मुंबईकरांची पावसापासून सुटका होणार आहे. राज्यात परत १५ ते १७ जुलैनंतर विखुरलेल्या स्वरुपात पाऊस पडेल. नांदेड, लातूर, धाराशिव, सोलापूर, बीड या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडेल. तर राज्यात पुन्हा चांगल्या पावसासाठी जुलैच्या शेवटच्या आठवड्याची वाट बघावी लागेल, असा दावा पंजाबराव डख यांनी केला.

वातावरणात तयार झालेला कमी दाबाचे क्षेत्र आता गुजरात, तिथून मध्य प्रदेशात जाणार आहे. त्यानंतर पुढे ते उत्तर प्रदेशात जाईल आणि नेपाळच्या दिशेला स्थिरावेल, अशी माहिती त्यांनी दिली.

सोशल मीडियावर अफवा पसरवल्या जात आहेत की, परत पाऊस येणार नाही. पण शेतकऱ्यांनो घाबरु नका. जुलैच्या शेवटच्या आठवड्यात पुन्हा जोरदार पाऊस येणार आहे. पाऊस बिल्कुल येणार आहे. दुष्काळ वगैरे काही पडणार नाही. जुलैच्या शेवटच्या आठवड्यात मोठा पाऊस येईल, असं पंजाबराव डख यांनी सांगितलं.

१५ ते १६ दरम्यानही तुरळक पाऊस पडणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपली शेतीची कामे करुन घ्यावीत. यावर्षी शेतकऱ्यांसाठी चांगलं साल राहणार आहे. भरपूर पाऊस पडणार आहे. पीकं चांगलं येणार आहेत, असं डख म्हणाले.

जुलैच्या शेवटच्या आठवड्यात बंगालच्या खाडीत पुन्हा एक चक्रीवादळ तयार होईल. आपल्या महाराष्ट्राला यावर्षी अर्ध्या राज्याला पूर्वेतून पाऊस पडणार आहे. तर मुंबई ते अहिल्यानगरपर्यंत अरबी समुद्रातून पाऊस येणार आहे. त्यामुळे यावर्षी चांगला पाऊस पडणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांची काळजी घ्यावी, असं आवाहन पंजाबराव डख यांनी केलं आहे.

# समान नागरी कायद्याच्या मसुद्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती गठीत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताच्या संविधानातील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक राज्याने समान नागरी कायद्याचा विचार करावा, असे निर्देश आहेत. त्यानुसार २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्याची घो-षणा करण्यात आली होती. त्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत या समितीची स्थापना करण्यात येत आहे.




समितीमध्ये न्यायमूर्ती रंजना देसाई (माजी न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय), न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण (माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), न्यायमूर्ती एस. जी. मेहरे (माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), डी. के. जैन (माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य), ॲड. वीरेंद्र सराफ (माजी महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य), रमेश पतंगे (पद्मश्री व संविधान अभ्यासक) आणि सुवर्णा रावल (शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या) यांचा समावेश आहे.

ही समिती पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल राज्य शासनाला सादर करेल. या अहवालाच्या आधारे येत्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचे विधेयक विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

# मुंढवा जमीन वादात न्यायालयाचा मोठा आदेश; पार्थ पवारांच्या कंपनीचा दस्त रद्द

पुणे : पुण्यातील बहुचर्चित मुंढवा जमीन प्रकरणात महत्त्वाचा न्यायालयीन निर्णय देण्यात आला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार भागीदार असलेल्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी कंपनीच्या नावावरील ४० एकर जमीन खरेदीचा दस्त न्यायालयाने रद्द केला आहे. या निर्णयामुळे पुन्हा एकदा या वादग्रस्त व्यवहाराची चर्चा सुरू झाली आहे. मुंढवा येथील सुमारे ४० एकर सरकारी मालकीची जमीन बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला भाडेतत्त्वावर देण्यात आली होती. या जमिनीचा सुमारे ३०० कोटी रुपयांचा खरेदी व्यवहार अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपीसोबत करण्यात आला होता. मात्र, या जमिनीचे बाजारमूल्य जवळपास १,८०० कोटी रुपये असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या व्यवहारात आयटी पॉलिसीतील तरतुदींचा गैरवापर करून सुमारे २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क टाळण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच ३०० कोटी रुपयांच्या व्यवहाराचा दस्त केवळ ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोंदविण्यात आल्याचा मुद्दाही या प्रकरणात चर्चेचा विषय ठरला होता.






# पुण्यात मावळमध्ये दरड कोसळून घर गाडले; ९ जणांची सुटका,युद्धपातळीवर बचावकार्य सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात मुसळधार पावसामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. विसापूर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाटण गावात पहाटे दरड कोसळून एका कुटुंबाचे घर मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून बचावकार्य युद्धपा-तळीवर सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास दरड कोसळल्यानंतर घरातील सदस्य अडकल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, महसूल प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, लष्कर, अग्निशमन दल आणि स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे बचाव मोहीम सुरू केली. बचाव पथकांनी आतापर्यंत ९ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश मिळवले आहे. मात्र, आणखी ८ ते ९ जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून त्यांचा शोध सुरू आहे. जेसीबी आणि अत्याधुनिक बचाव उपकरणांच्या मदतीने मातीचा ढिगारा हटविण्याचे काम सुरू आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, पहाटे अचानक मोठा आ-वाज झाला आणि काही क्षणांतच संपूर्ण घर मातीखाली गाडले गेले. सततच्या मुसळधार पावसामुळे परिसरातील डोंगरभाग अस्थिर झाल्याने ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

## विभागीय आयुक्त विजया लक्ष्मी बिदरी यांची माहिती


# सैराट फेम अरबाज शेखच्या व्हिडिओची दखल; नोबेल हॉस्पिटलच्या मेडिकलवर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: मराठीतील गाजलेल्या सैराट चित्रपटातील अभिनेता अरबाज शेख यांच्या तक्रारीनंतर सोलापुरातील नोबेल हॉस्पिटलशी संलग्न मेडिकलवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कारवाई केली आहे.

तपासणीदरम्यान गंभीर त्रुटी आढळून आल्याने संबंधित मेडिकलमधील औषधविक्री तातडीने बंद करण्यात आली. या कारवाईनंतर अरबाज शेख यांनी व्हॉट्सअॅप स्टेटसद्वारे हा विषय आता आपल्यासाठी संपला असल्याचे सांगत सर्वांचे आभार मानले आहेत.

अरबाज शेख यांनी काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट करत त्यांच्या वडिलांच्या उपचारादरम्यान आ-लेला अनुभव मांडला होता. त्यांनी आरोप केला होता की, रुग्णांना हॉस्पिटलशी संलग्न



मेडिकलमधूनच औषधे खरेदी करण्यास सांगितले जात होते. तसेच, सुरुवातीला १० हजार रुपयांची ठेव (डिपॉझिट) भरल्यानंतर सुमारे ४० हजार रुपयांहून अधिक किमतीची औषधे व इंजेक्शन्स त्याच मेडिकलमधून घेण्यास सांगण्यात आल्याचा दावा त्यांनी केला होता.

या तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने नोबेल हॉस्पिटलशी संलग्न फातिमा फार्माची तपासणी केली. तपासणीदरम्यान गंभीर त्रुटी आढळल्याने संबंधित मेडिकलमधील औषधविक्री तात्पुरती बंद करण्याचे आदेश देण्यात आले.

दरम्यान, कारवाईनंतर अरबाज शेख यांनी व्हॉट्सअॅप स्टेटसद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी म्हटले की, संबंधित व्हिडिओ पोस्ट केल्यानंतर मोठ्या प्रमाणात फोन आणि संदेश येऊ लागल्याने तो व्हिडिओ हटविण्यात आला. तसेच प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई केल्याबद्दल समाधान व्यक्त करत, सध्या माझ्या वडिलांची प्रकृती आणि कुटुंब माझ्यासाठी सर्वांत महत्त्वाचे आहे. त्यामुळे हा विषय माझ्यासाठी इथेच संपला आहे. कठीण काळात साथ देणाऱ्या सर्वांचे आभार, असे त्यांनी नमूद केले. दरम्यान, या प्रकरणामुळे खासगी रुग्णालयांमधील औषध खरेदीच्या पद्धती आणि रुग्णांच्या निवडीच्या अधिकाराबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

# कर्नाटक प्रश्नावर महाराष्ट्राची बाजू भक्कमपणे मांडणार ! आमदार सचिन कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील सुरू असलेल्या सीमाप्रश्नावर मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची विशेष बैठक विधिमंडळाच्या मंत्रिमंडळ बैठक सभागृहात पार पडली. या बैठकीत देशाच्या सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नाबाबत सुरू असलेल्या खटल्यात महाराष्ट्राची बाजू भक्कमपणे मांडण्यात यावी, यासाठी कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.




यासोबतच सीमाभागातील मराठी बांधवांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून त्यादृष्टीने आवश्यक बाबींवर चर्चा करण्यात आली. यासोबतच सीमाप्रश्नावर महाराष्ट्राची भूमिका भक्कम असून, राज्याच्या न्याय्य हक्कांसाठी सर्वोच्च न्यायालयात प्रभावीपणे बाजू मांडण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री मा.श्री. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री




श्रीमती सुनेत्रावहिनी पवार, खासदार मा.श्री. शरदचंद्र पवार, खासदार श्री. नारायण राणे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील, पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई, मंत्री श्री. हसन मुश्रीफ, आमदार श्री. जयंत पाटील, आमदार श्री. सुरेश खाडे, आदर. श्री. सुधीर गाडगीळ, आमदार श्री. रोहित आर. पाटील, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष श्री. राजेश क्षीरसागर तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आणि ज्येष्ठ वकील उपस्थित होते.

## संपादकीय....

### मान्सून लांबले

नैऋत्य मान्सून राजस्थान, हरियाणा आणि पंजाबच्या उर्वरित भागांतही पुढे सरकला असून, त्याने संपूर्ण देश व्यापला असल्याचे भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) गुरुवारी सांगितले. 'मान्सून देशभरात सर्वदूर पसरण्यासाठी तसा एक दिवसाचा विलंब झाला यंदा मान्सूनचे केरळमधील आगमनही लांबले. एरवी १ जूनला दाखल होणाऱ्या मान्सनचे यावर्षी ४ जून रोजी आगमन झाले. मात्र, जुलै महिन्यात देशात आत्तापर्यंत पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त आहे. महिन्याच्या पहिल्या नऊ दिवसांत ७३.८ मिमी इतका पाऊस पडणे अपेक्षित असताना, संपूर्ण देशात १०१.९ मिमी पावसाची नोंद झाली. 'आयएमडी'ने ३० जून रोजी जाहीर केलेल्या मासिक अंदाजात महिन्याच्या पहिल्या सात ते १० दिवसांत संपूर्ण देशात पावसाचा अंदाज वर्तवला होता. त्याच वेळी जुलै महिना नेहमीपेक्षा कमी पावसाचा असेल आणि देशभरातील पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या (एलपीए) ९४ टक्के इतका राहण्याची शक्यता असल्याचेही यात असेही नमूद करण्यात आले होते. 'एलपीए' म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशात ठरावीक कालावधीत (उदा. एखादा महिना किंवा हंगाम) पडलेल्या पावसाची दीर्घ कालावधीच्या (साधारणपणे ३० ते ५० वर्षे) आकडेवारीवरून काढलेली सरासरी होय. सन १९०१नंतर या महिन्यात देशात झालेला हा पाचव्या क्रमांकाचा सर्वांत कमी (९९.५ मिमी) पाऊस होता. 'आयएमडी'च्या आकडेवारीनुसार, १ जून ते ९ जुलै या कालावधीत देशात एकूण पावसाची तूट १४ टक्के इतकी आहे. या वर्षीचा मान्सून पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के राहण्याची शक्यता असून, यात चार टक्के मॉडेलमधील त्रुटी (मॉडेल एरर) असू शकते, असे 'आयएमडी'ने म्हटले आहे. विषुववृत्तीय पॅसिफिक महासागरावर निर्माण होणारी 'एल निनो' स्थिती या तुटीचे एक मुख्य कारण आहे.

## बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती व समुपदेशनावर भर : महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती, समुपदेशन, कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य प्रशांत बंब आणि कैलास पाटील यांनी अर्धा तास चर्चेद्वारे उपस्थित केलेल्या प्रश्नाला त्या उत्तर देत होत्या.

महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ नुसार मुलींसाठी विवाहाचे किमान वय १८ वर्षे आणि मुलांसाठी २१ वर्षे असून, त्यापेक्षा कमी वयातील विवाह हा कायद्याने गुन्हा आहे. विशेष विवाह कायदा आणि इतर वैयक्तिक कायद्यांमध्येही हीच वयोमर्यादा लागू आहे. भारतीय सज्ञानता कायद्यानुसार १८ वर्षे पूर्ण झालेली व्यक्ती सज्ञान मानली जाते आणि तिला वैयक्तिक निर्णय घेण्याचा तसेच जोडीदार निवडण्याचा घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे पालकांची सहमती किंवा असहमती यावर आधारित वेगवेगळ्या वयोमर्यादा निश्चित करणे हे संविधानातील समानतेच्या तत्त्वाशी सुसंगत ठरणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुलींच्या विवाहाचे किमान वय १८ वरून २१ वर्षे करण्यासाठी केंद्र सरकारने मांडलेले सुधारणा विधेयक संसदेच्या स्थायी समितीकडे विचाराधीन असल्याचे त्यांनी सांगितले. विवाहाचे वय बदलायचे असल्यास ते सर्वांसाठी समान स्वरूपातच कायद्याने बदलणे हा घटनात्मकदृष्ट्या योग्य मार्ग असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राज्यात बालविवाह रोखण्यासाठी विविध स्तरांवर प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे सांगत मंत्री तटकरे म्हणाल्या, बालविवाहाची माहिती मिळताच संबंधित मुलगी किंवा मुलगा अल्पवयीन असल्यास पालकांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई केली जाते. तसेच विवाह लावून देणारे कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या संबंधित व्यक्ती, आयोजक यांच्यावरही कायद्यानुसार कारवाई केली जाते.

राज्य सरकार नवीन बालधोरण तयार करत असून त्यामध्ये मुलांचा सोशल मीडियाचा वापर, स्क्रीन टाइम, मानसिक आरोग्य, शारीरिक आरोग्यावर होणारे परिणाम आणि आवश्यक निर्बंध यांचा विचार करण्यात येणार असल्याचेही मंत्री तटकरे यांनी सांगितले. केंद्र सरकारकडून विवाहविषयक कायद्यांमध्ये भविष्यात सुधारणा करण्याबाबत राज्यांचा अभिप्राय मागविण्यात आल्यास, बालविवाह प्रतिबंध आणि तरुणांच्या हिताचे आवश्यक मुद्दे राज्य शासनाच्या वतीने मांडले जातील, असेही मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी सांगितले.

## पडघ्यात बियर बारमध्ये तरुणावर जीवघेणा हल्ला, आरोपी अटकेत; न्यायालयाकडून चार दिवसांची पोलीस कोठडी

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील राहुल बारमध्ये किरकोळ वादातून एका तरुणावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात अतुल जाधव हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर लाईफ लाईन या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पडघा पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी अल्ताफ सय्यद (वय २६) याला अटक केली असून, भिवंडी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, अतुल जाधव आणि आरोपी अल्ताफ सय्यद हे दोघेही राहुल बारमध्ये बसले असताना खुन्नस का देतोस? या कारणावरून त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने धारदार हत्याराने अतुल जाधव यांच्यावर वार केले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच पडघा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून तपास सुरू केला. तातडीने तपासाची सूत्रे हलवत पोलिसांनी आरोपीला अटक केली. याप्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर पडघा परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी तात्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत नागरिकांना शांतता आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले आहे.

## आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई; पंढरपुरात ६८ आस्थापनांची तपासणी, १०५ नमुने घेतली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक नऊ जुलै २०२६ आषाढी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर शहरामध्ये येणाऱ्या लाखो भाविकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ मिळावे यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने दिनांक आठ जुलै २०२६ रोजी शहरात धडक तपासणी मोहीम राबवली व या मोहिमेत अन्न व औषध प्रशासनाचे अधिकाऱ्यांनी पंढरपूर शहरातील हॉटेल्स, मिठाई दुकाने, फरसाण केंद्रे, खानावळी, प्रसाद विक्रेते, अशा ६८ आस्थापनांची अचानक तपासणी केली व तपासणी दरम्यान विविध खाद्यपदार्थांचे १०५ नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत.

निकृष्ट आढळल्यास कारवाई नमुन्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निकृष्ट दर्जाचे किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ आढळल्यास संबंधित आस्थापनावर अन्य व सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची प्रशासनाचे स्पष्ट केले आहे. तसेच सर्व व्यवसायिकांनी स्वच्छता गुणवत्ता व नियमाचे पालन करावे असे आव्हान अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई यांनी केली आहे. वारी काळात विशेष दक्षता आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपुरात देशभरातून लाखो भाविकांची वारकरी दाखल होत असतात व या काळात भेसळयुक्त निकृष्ट दर्जाचे किंवा उघड्यावरील अन्नपदार्थांमुळे भाविकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे अन्नपदार्थ साठवणूक स्वच्छता वापरले जाणारे तेल, रंग, व इतर घटकांची गुणवत्ता याबाबत काटेकोर तपासणी करण्यात आली आहे.

## उजनी धरणातील जैवविविधता व उपजीविकेसाठी 'मित्रा'कडून १६ कोटींचा निधी : प्रवीणसिंह परदेशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) :- उजनी धरणातील जैवविविधता संवर्धन तसेच परिसरातील स्थानिकांच्या उपजीविकेसाठी 'मित्रा' संस्थेकडून १६ कोटी रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून देणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित उजनी धरणातील विविध प्रश्नांवरील आढावा बैठकीत श्री. परदेशी बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, वनविभागाचे रेंज ऑफिसर रोहित कुमार गारगडे, बीएचएनएस ट्रस्टचे डॉक्टर उन्मेश काटवटे, मत्स्य व्यवसायिक भरत मालव तसेच मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री. परदेशी पुढे म्हणाले की, उजनी धरणात आफ्रिकन कॅट फिश माशामुळे मोठ्या प्रमाणावर स्थानिक माशांच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. मंगुर, सकर माउत यासारख्या कॅट फिश मुळे उजनी धरणातील जैवविविधतेला धोका निर्माण झालेला आहे. कॅट फिश खाण्यास हानिकारक आहेत, तसेच त्यामुळे कॅन्सर सारख्या गंभीर आजाराचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढू शकतो त्यामुळे अशा आफ्रिकन कॅट फिश माशांच्या बीज उत्पादन करण्यास बंदी घातलेली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन तसेच मत्स्य व्यवसाय विभागाने स्थानिक माशांच्या बीज उत्पादनास प्रोत्साहन देण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच उजनी धरण क्षेत्रातील मासेमारी करणाऱ्या नागरिकांचे प्रबोधन करावे, असे आवाहन त्यांनी केले.




उजनी धरणातील जैवविविधता टिकवण्यासाठी प्रशासनाच्या वतीने उचित कार्यवाही करण्यात येईल. तर १६ कोटींच्या निधीतून' स्थानिक माशांच्या संवर्धन व प्रजनन केंद्रांसह मच्छीमारांच्या उपजीविकेशी संबंधित प्रकल्प राबवले जाणार असल्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगितले.

यावेळी बी एन एच एस ट्रस्टचे डॉक्टर उन्मेश काटवटे यांनी या संस्थेमार्फत उजनी धरण येथील जैवविविधता तसेच आफ्रिकन कॅट फिश व स्थानिक माशाबाबतच्या केलेल्या अभ्यासात आलेली आकडेवारी बैठकीत सादर केली. ट्रस्टच्या वतीने मासेमारी करणाऱ्या नागरिकांचे प्रबोधन करण्यात येत असून आफ्रिकन कॅट फिश उत्पादन व पैदास करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. स्थानिक माशाच्या बीज उत्पादनास प्रोत्साहन दिले जात आहे. मागील ३० ते ४० वर्षाचा अभ्यास केला असता उजनी धरणातील स्थानिक ३० ते ३५ माशांच्या प्रजाती कायमच्या नष्ट झालेले आहेत तर ४० प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उजनी धरण परिसरात मासेमारी करणारे श्री भरत मालाव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व सकरमाऊथ माशामुळे स्थानिक माशावर मोठा प्रघात झाला असून हे मासे मासेमारीच्या जाळ्याही फाडतात तसेच स्थानिक माशांनाही खातात असे त्यांनी सांगितले.

बैठकीतील महत्त्वाचे निर्णय

१. १६ कोटींचा निधी

उजनी धरण परिसरातील जैवविविधता जतन व मच्छीमारांच्या उपजीविकेसाठी निधी देण्याचे आश्वासन देण्यात आले.

२. फिश मील व फिश ऑईल उद्योगासाठी चाचपणी

उजनी पाणलोट क्षेत्रात फिश मील आणि फिश ऑईल उद्योग आणता येईल का, याचा अभ्यास/चाचपणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

३. आक्रमक वनस्पतींचे उच्चाटन

आयपोमिया (खोंशिर) व वेळी बाभूळ/झींोळिी क्षींश्रळ-षश्रीर यांसारख्या आक्रमक वनस्पती परिसरातून काढण्यासाठी खांडेकर यांनी स्वखर्चाने तात्काळ कारवाई करावी, असा इशारा देण्यात आला. अन्यथा वाळू व माती उत्खनन तात्काळ थांबवण्याची चेतावणी देण्यात आली.

४. अवैध आफ्रिकन मांगूर पैदाशीवर कारवाई

बेकायदा आफ्रिकन मांगूर (षीळलरप लरींषळीह) पैदाशी संदर्भात कायदेशीर कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षकांची मदत उपलब्ध करून देण्यासंदर्भात बैठकीत स्पष्टता झाली.

५. मत्स्य विभागाला छाप्याचे आदेश

मत्स्य व्यवसाय विभागाने मांगूर माशांच्या पैदास केंद्रांवर तात्काळ छापे टाकावेत आणि स्थानिक माशांच्या साठ्यात वाढ करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

६. सामंजस्य करार (चेण)

आक्रमक माशांच्या प्रजातींचे व्यवस्थापन आणि स्थानिक प्रजातींच्या संवर्धन-प्रजनन कार्यक्रमासाठी मत्स्य व्यवसाय विभाग व महाराष्ट्र शासन यांच्याशी सोमवार, दि. १४ जुलै २०२६ पर्यंत चेण करण्याचे ठरले. हा करार पाटबंधारे विभागाच्या धर्तीवर करण्यात येईल. यासाठी सह आयुक्त (मत्स्य व्यवसाय) आयएएस प्रेरणा देशभ्रतार यांच्याशी समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या.

७. उप आयुक्तांसोबत स्वतंत्र बैठक

मत्स्य व्यवसाय उप आयुक्त, सोलापूर यांच्यासोबत स्वतंत्र बैठक घेण्याचेही ठरवण्यात आले.

८. सामाजिक वनीकरणातून लागवड

सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी (ठऋज) यांनी उजनी परिसरात स्थानिक जलचर वनस्पतींची लागवड करण्यासाठी मदत करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

धरणाच्या परिसंस्थेला धोका-तातडीच्या उपाययोजना

उजनी धरणातील वाढते प्रदूषण, आफ्रिकन कॅटफिशचा धोका आणि आक्रमक वनस्पतींमुळे परिसंस्थेला गंभीर धोका निर्माण झाला असल्याचे बैठकीत अधोरेखित करण्यात आले. त्यामुळे तातडीच्या उपाययोजनांवर भर देण्यात आला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# गोगाव जिल्हा परिषद शाळा ते गोगाव पर्यंत रस्त्याची दुरवस्था

## विद्यार्थ्यांना करावी लागतेय तारेवरची कसरत ; रस्ता दुरुस्तीची नागरिकांतून मागणी






गेल्या अनेक वर्षापासून पावसाळ्यात सदर रस्ता चिकलमय होत असून जिल्हा परिषद शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना चिखलातून जाव लागत आहे सदर रस्ता गावास जोडणारा मुख्य रस्ता असून पांढरा दिवसांपूर्वी झालेल्या पाऊसने वडयाजवळील फूलाचे मोठी नुकसान झालेले आहे या बाबत आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्याकडे पाठपुरावा चालू असून लवकर जिल्हा नियोजन मधून निधी मिळेल अशी आशा आहे

**कमलाकर सोनकांबळे (उपसरपंच गोगांव)**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

गोगांव तालुका अक्कलकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ते गोगाव पर्यंतचा रस्त्याची दुरवस्था झाली आहे. वागदरी ते गोगाव खैराट हा रस्ता अतिशय खराब झाला असून भोगाव जिल्हा परिषद शाळा पासून ते गोगाव गावापर्यंत रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले पावसाळ्यात संपूर्ण पाणी रस्त्यावर थांबल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्त्यावर पाणी साचल्याने रस्त्याला तळ्याचे स्वरूप येत आहे.

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी हा एकच रस्ता असल्याने या रस्त्याने चालत शाळेत जाणे जिकरीचे बनले आहे. पावसाळ्यात रस्ता कुठे व खड्डा कुठे आहे हे दिसत नसल्याने विद्यार्थीना खड्यात पडून शाळेत जावा लागत आहे.

या रस्त्यावरून वाहन चालवताना चालकास कसरत करावी लागत आहे. तर मोटरसायकल स्वरांची तारेवरची कसरत चालू असतो, रस्त्याची अवस्था अतिशय बिकट बनले असून रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता असा सवाल गावकरी व प्रवासी करत आहेत. तरी संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याने याकडे जातीने लक्ष देऊन वागदरी ते खैराट व जिल्हा परिषद शाळा गोगाव ते गोगाव गावापर्यंतचा पर्यंत चा रस्ता दुरुस्त करून द्यावा अन्यथा रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

# आयुष्मान आरोग्य मंदिराला राष्ट्रवादी कॉंग्रेस उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांची भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी): पंढरपूर येथील जुना कराड नाका सुलेमान चाळ परिसरातील आयुष्मान आरोग्य मंदिर नंबर २ येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी सदिच्छा भेट देऊन आरोग्य केंद्रातील विविध सुविधा व आरोग्य सेवांची पाहणी केली.

यावेळी आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या आधुनिक सुविधा तसेच शासनामार्फत सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी मोफत करण्यात येणाऱ्या विविध महागड्या वैद्यकीय तपासण्यांची माहिती घेऊन नागेश फाटे यांनी आरोग्य केंद्राच्या कार्याचे कौतुक केले. अशा सुविधा गरजू नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त असून त्यांचा अधिकाधिक लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या भेटीदरम्यान मेडिकल ऑफिसर डॉ. राजश्री धनंजय सालविठ्ठल यांनी आरोग्य केंद्रातील शासना कडून दिल्या जाणाऱ्या सर्व मोफत तपासण्याची माहिती दिली.

सदर आरोग्य केंद्र कडे सदर वॉर्ड चे नगरसेवक तथा विद्यमान उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे आणि सर्व आजी माजी नगरसेवकांचे लक्ष असते.

यावेळी स्टाफ नर्स पुनम वाघमारे, प्रशांत पाटील, दत्तराज गाडे, स्मिता जोशी, सोनाली मोहिते, एस. यू. लिगाडे, औदुंबर नरोटे तसेच ड. पांडुरंग चवरे, नवनाथ बचूटे, भास्कर गायकवाड आणि आरोग्य केंद्रातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

# होडी चालक, मालकांनी आसनक्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतुक करु नये

### प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आदेश केला पारीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुध्द एकादशी दि.२५ जुलै २०२६ रोजी असून, यात्रा कालवधी १५ ते २९ जुलै असा आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी १८ ते २० लाख भाविक पंढरपूरात येतात. वारकऱ्यांसाठी चंद्रभागा स्नान पवित्र स्नान मानले जाते. चंद्रभागा स्नानासाठी नदी पात्रात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. तसेच येणारे भाविक चंद्रभागा नदी पात्रातून विष्णूपद, इस्कॉन मंदीर येथे नौका विहार करतात. या कालावधीत कोणतीही अनुचित घडना घडू नये तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी होडी चालक, मालकांनी आसनक्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतुक करु नये यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आदेश पारीत केला आहे .

होडी चालक, मालकांनी वारी कालावधी अगोदर आपल्या होडींची दुरुस्ती करुन घ्यावी व वेळोवेळी देखभाल करावी.योग्य आसन क्षमता प्रवासी व चालक, मालकसहित निश्चित करावी. जलप्रवासी वाहतुकीचे वेळापत्रक निश्चित करावे, सूर्योदयापूर्वी व सुर्यास्तानंतर होडीतून प्रवासी वाहतुक करू नये. जलवाहतूकीदरम्यान सुरक्षेच्या साधनांचा प्रवाशी व चालक यांनी अनिवार्यपणे वापर करण्यास तसेच नियमित करून दिलेल्या वेळेत जल-वाहतूक करावी. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आदेश सदर पारीत केला आहे.

### सूर्योदयापूर्वी व सुर्योस्तानंतर जलप्रवास वाहतुक बंद ठेवावी

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे ही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# बसवकल्याण क्षेत्र समितीच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी बसवराज दिंडोरे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : बसवकल्याण क्षेत्र समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या बैठकीत सोलापूर जिल्हाध्यक्षपदी बसवराज दिंडोरे, सोलापूर शहराध्यक्षपदी चनबसप्पा गुरुभेट्टी आणि शहर कार्याध्यक्षपदी सिद्धाराम तांबुळे यांची निवड करण्यात आली. या निवडींचे उपस्थित पदाधिकारी व समाजबांधवांनी स्वागत करून अभिनंदन केले.

उन्नती हॉटेल अँड लॉन्स, क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे प्रभारी डॉ. अमरनाथ सोल-पुरे होते. यावेळी समितीचे प्रदेशाध्यक्ष माधवराव पाटील टाकळीकर (लातूर), प्रदेश उपाध्यक्ष विजयकुमार हत्त-ुरे (सोलापूर), प्रदेश सचिव प्रा. शेषराव शेटे, प्रा. सुनील हेंगणे, प्रा. राजेश विभुते, छत्रपती संभाजीनगरचे प्रमुख प्रदीप बुरांडे, वीरेंद्र मंगलगे, सचिन संगशेट्टी, गणेश वैद्य, छत्रपती संभाजीनगरचे नूतन जिल्हाध्यक्ष सचिन खैरे, जालना येथील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. कोरे, बबलू सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत बसव भारत उत्सव २०२७, नूतन अनुभव मंटप, बसवकल्याण क्षेत्र विकास उपक्रम, तसेच समाजातील धार्मिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक कार्यक्रमांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी संघटन बळकटीकरणाच्या दृष्टीने विविध पदांवरील नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा प्रसार, समाज संघटन आणि बसवकल्याण क्षेत्राशी संबंधित उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्यांच्या निवडीमुळे सोलापूर जिल्हा व शहरातील समितीच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांवर विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### १० जुलैपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा

# मंगरूळ गावच्या मागण्यांसाठी चक्रधर रितापुरे यांचे ठिय्या आंदोलन सुरू




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब दि.९(प्रतिनिधी) : कळंब तालुक्यातील मंगरूळ - गावातील मूलभूत सुविधा आणि विकासाच्या मागण्यांसाठी मंगरूळ ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला असून कोणत्याही पक्षाशी किंवा संघटनेशी संबंध नसताना माझं गाव हीच माझी संघटना या भावनेने गावकरी एकत्र आले आहेत. त्यानुषंगाने मंगरुळ येथील युवक चक्रधर उर्फ संभाजी रितापुरे यांच्या नेतृत्वाखाली दि. ५ जुलै २०२६ रोजी पासुन मंगरूळ गावाच्या विकासासाठी मुख्य चौकात हनुमान मंदिरासमोर ठिय्या आणि मुक आंदोलन सुरू करण्यात आले असून प्रशासनाने १५ दिवसात संबंधित मागण्यांवर निर्णय न घेतल्यास दि. १० जुलै २०२६ पासून याच ठिकाणी आमरण उपोषण सुरू करण्यात येणार गावातील युवक चक्रधर उर्फ संभाजी रितापुरे यांनी या वेळी सांगितले. या उपोषणात आंदोलकांच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे करण्यात आल्या आहेत. या मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाचे शासकीय जागेतून झालेले स्थलांतर रद्द करून बँक पूर्ववत करणे किंवा पर्यायाने एस.बी. आय. कडून सी. एस आर. फंडातून मंगरूळ प्राथमिक आरोग्य केंद्रात महिलांसाठी सोनोग्राफी सेंटर, डिजिटल लायब्ररी, सोलर सिस्टीम आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे. याशिवाय घाडगे वस्ती ते जुना मंगरूळ, जवळा पाटी ते मंगरूळ रोड, बरड वस्ती येथील जाधव व काळे यांच्या घरापासून ते खामसवाडीकडे जाणारा रस्ता, मंगरूळ ते शेळके धानोरा रोड आणि बी. एस. एन. एल ऑफिस ते शेळका धानोरा पाटी या रस्त्यांचे तातडीने सिमेंटकरण व दुरुस्ती करून कालमर्यादेसह लेखी मंजुरी देण्याची मागणी करण्यात यावी, माता-भगिनींच्या सुरक्षिततेसाठी आणि तरुण पिढी व्यसनापासून वाचावी यासाठी गा-वात संपूर्ण दारूबंदी लागू करण्यात यावी अशीही यावेळी उपोषण कर्ते यांच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनात गावातील सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन उपोषण कर्ते चक्रधर उर्फ संभाजी रितापुरे यांनी केले आहे.

### देहू देवस्थानचे माजी अध्यक्ष ह.भ.प. बापूसाहेब मोरे यांचे विचार

### महा प्रवेशद्वाराच्या उभारणीचा इतिहास उलगडणाऱ्या 'विशेष पुस्तिकेचे प्रकाशन

# भक्ती व ज्ञानाचे जिवंत प्रतीक 'ज्ञान-कर्म-भक्तियोग' महाप्रवेशद्वार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या वतीने आयोजन.

आळंदी : देहू येथील 'ज्ञान-कर्म-भक्तियोग' महाप्रवेशद्वार केवळ एक वास्तू नसून भक्ती आणि ज्ञानाचे जिवंत प्रतीक आहे. विश्वधर्म प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी श्री-क्षेत्र आळंदी देहू विकास समितीच्या माध्यमातून उभारलेल्या या महाप्र-वेशद्वाराचे जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यात मोठे योगदान आहे. असे विचार संत श्री तुकाराम महाराजांचे वंशज व देहू देवस्थानचे माजी अध्यक्ष ह.भ.प. बापूसाहेब मोरे यांनी मांडले.



जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याचे औचित्य साधून विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या वतीने 'तत्त्वज्ञ जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज ज्ञान-कर्म-भक्तियोग महाप्रवेशद्वाराच्या' रौप्य महोत्सवी (२५ व्या) वर्षानिमित्त, समितीच्या कार्याचा आणि महाप्रवेशद्वाराच्या उभारणीचा इतिहास उलगडणाऱ्या 'विशेष पुस्तिकेचे प्रकाशन त्यांच्या हस्ते देहू येथे करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. हा प्रकाशन सोहळा विश्वशांती दिंडी (आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर) च्या संस्थापक अध्यक्षा ह.भ.प. उषा विश्वनाथ कराड व श्री क्षेत्र भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी देहूच्या नगराध्यक्षा पूजा दिवटे, उपनगराध्यक्षा प्रियांका मोरे, श्री क्षेत्र आळंदी देहू परिसर विकास समितीच्या समन्वयक आणि माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड-चाटे, ह.भ.प नितीन महाराज मोरे, देहू देवस्थानचे माजी विश्वस्त बाळासाहेब मोरे, माजी ग्रामपंचायत सदस्य देहू बाळासाहेब काळोखे, नंदकुमार काळे, विठ्ठलराव काळोखे, पुणे जि.प. माजी सदस्य माऊली काळोखे, माजी सरपंच अशोक मोरे, ह.भ.प डॉ. सुदाम महाराज पानेगांवकर, प्रा. विकास कंद तसेच देहू नगरपरिषदेचे आजी माजी सदस्य, ग्रामस्थ आणि वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प. बापूसाहेब मोरे म्हणाले, २५ वर्षापूर्वी जगतगुरु तुकोबारायांच्या नावाला साजेसे असे महा प्रवेशद्वार उभे राहिले. या महाद्वाराच्या निर्मितीने देहूच्या वैभवात मोठी वाढ झाली आहे. आज २५ वर्षांनंतर या संपूर्ण प्रवासाचा इतिहास पुस्तिकेच्या माध्यमातून समाजासमोर येत आहे. ही पुस्तिका भावी पिढीला संत विचारांची आणि तीर्थक्षेत्राच्या विकासाची नक्कीच प्रेरणा देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्री क्षेत्र भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशिद यांनी मनोगतात सांगितले की, श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीने गेल्या अनेक वर्षांत देहू तीर्थक्षेत्राच्या विकासात जे योगदान दिले आहे, त्याचा इतिहास या पुस्तिकेतून जिवंत झाला आहे. असे मत त्यांनी मांडले.

प्रा. स्वाती कराड चाटे म्हणाल्या की, विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेल्या या भव्य महाप्र-वेशद्वाराला आज २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या वास्तूच्या उभारणे मागील परिश्रम, इतिहास आणि समितीच्या कार्याला उजाळा देण्याच्या उद्देशानेच आम्ही या पुस्तिकेचे प्रकाशन केले असून, प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचे संत सेवा आणि विश्वशांतीचे कार्य भविष्यातही अविरत सुरू ठेवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब काळोखे यांनी केले, सूत्रसंचालन संदीप वसंत शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन उमेश टीजगे यांनी केले.

# अक्कलकोट तालुक्यात पाऊस गायब

## सुसाट वाऱ्यामुळे ढग पळाले, खरीप पेरण्या रखडल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
विश्वनाथ चव्हाण, अक्कलकोट

जून महिना संपून आता जुलै महिना देखील निम्म्यावर आला आहे, तरीही अक्कलकोट तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. पुरेसा पाऊस नसल्यामुळे खरीप पेरण्या पूर्णपणे रखडल्या असून बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

हवामान विभागाने यंदा चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवला होता,मात्र अक्कलकोट तालुक्यातील सद्यस्थिती अत्यंत विदारक आहे.पावसाळ्याचा दुसरा महिना सुरू झाला तरी अद्याप पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही.परिसरात केवळ सुसाट वारा वाहत असून,ढग दाटून येतात पण पाऊस मात्र हुलकावणी देत आहे.यामुळे आता येथील शेतकरी कमालीचा चिंतेत पडला आहे.

अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांनी मे महिन्यापासूनच पूर्वमशागतीची कामे आटोपून पेरणीची जय्यत तयारी केली होती.महागडी खते आणि बी-बियाणांची खरेदी करून शेतकरी सज्ज झाला होता.एखाद्या मोठ्या पावसाची प्रतीक्षा होती, जेणेकरून पेरणीचा श्रीगणेशा करता येईल.मात्र, निसर्गाच्या लहरीपणामुळे सुक्या भूमीत बियाणे कसे पेरायचे,असा यक्षप्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.सध्या हा बळीराजा केवळ चातकासारखी दमदार पावसाची प्रतीक्षा करत आहे. त्यातच विहिरींची पाणीपातळी खोलवर जात असल्याने, आगामी काळात पिण्याच्या पाण्याचेही मोठे संकट उद्भवण्याची चिन्हे दिसत आहेत.





मागील वर्षी मे महिन्यापासूनच पावसाने हजेरी लावली होती. खरिपाची पेरणी वेळेत झाली आणि पिकेही जोमदार आली होती.मात्र,ऐन काढणीच्या वेळी अतिवृष्टी झाल्याने पिकांची मोठी नासाडी झाली आणि शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले.गेल्या वर्षीच्या नुकसानीतून शेतकरी सावरत नाही, तोच यंदा पावसाने दडी मारल्यामुळे पेरणीच होऊ शकलेली नाही.या दुहेरी संकटामुळे शेतकरी पूर्णपणे आर्थिक अडचणीत सापडला आहे.

एकंदरीत पाहता,येणारा काळ अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत कठीण आणि परीक्षेचा असणार आहे. सर्व शेतकऱ्यांचे डोळे आता आभाळाकडे लागले आहेत. ढग जमा होतात, पण सुसाट वाऱ्यामुळे पाऊस पडत नाही. निसर्गाच्या या लहरीपणामुळे शेतकरी पूर्णपणे आर्थिक खाईत लोटला जात आहे. आता हा मेघराजा चातकासारखी वाट पाहणाऱ्या शेतकऱ्याला तारणार की मारणार? हे येणारा काळच ठरवेल.



गेल्या वर्षी पाऊस वेळेवर आला होता, पण यंदा जुलै महिना अर्धा संपत आला तरी पाऊस नाही. सगळा पैसा खते आणि बियाणांवर खर्च केला आहे. आता पाऊसच पडला नाही, तर शेतकरी जगायचं कसं? आणि कर्ज कसं फेडायचं?
– **तुकाराम राठोड** (प्रगतशील शेतकरी,कडबगाव)

---

# स्वेरीच्या दोन विद्यार्थीनींची 'कॅड कॅम ब्रीज सोल्युशन्स प्रा.लि.' या नामांकित कंपनीत निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर: 'कॅड कॅम ब्रीज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीने घेतलेल्या निवड प्रक्रियेतून गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातील दोन विद्यार्थीनींची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली असून गतवर्षी विद्यार्थ्यांना प्लेसमेंट विभागाच्या माध्यमातून नोकरीच्या ४७३ संधी मिळाल्या आहेत तर आणखी काही कंपन्यांमधील निवडीचे निकाल येणे बाकी आहेत.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.




'कॅड कॅम ब्रीज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील अंजली अंकुश पाचकवडे व प्रतिक्षा नवनाथ चौगुले या दोन विद्यार्थीनींची निवड केली. 'कॅड कॅम ब्रीज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड' 'ही कंपनी ५ वर्षे जुनी असून २०२१ साली स्थापन झाली आहे. ही कॅड, सीएई, टूल डिझाईन व प्रोडक्ट डिझाईन क्षेत्रातील एक उदयोन्मुख कंपनी असून अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत असते. यामुळे विद्यार्थ्यांना अशा विविध क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मधील व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'कॅड कॅम ब्रीज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीत निवड झालेल्या दोन्ही विद्यार्थीनींचे अभिनंदन केले.

**इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना गतवर्षी प्लेसमेंटद्वारे नोकरीच्या तब्बल ४७३ संधी**

---

# श्री माणकेश्वर वाचनालय वाचन संस्कृतीचा अप्रतिम ठेवा : बर्डे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अमूलाग्र बदल होत असताना आजही समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत १०७ वर्षापासून यशस्वीपणे निफाडची वाचन चळवळ जोपासणारे श्री माणकेश्वर वाचनालय म्हणजे वाचन संस्कृतीचा अप्रतिम ठेवा असल्याचे प्रतिपादन निफाडचे नगरसेवक साहेबराव बर्डे व नगरसेवक संदीप शिंदे यांनी केले,ते श्री माणकेश्वर वाचनालयाच्या १०७ वा वर्धापन दिनानिमित्त बोलत होते,

यावेळी वाचनालयाचे संचालक श्याम गोळे व सोनाली गोळे यांचे हस्ते श्रीसत्यनारायण पुजन करण्यात येऊन .... छत्रपती शिवाजी महाराजांच्या तसेच संस्थापक कै.चिंतामणराव गाडगीळ,कै.भाऊसाहेब उगांवकर,कै.विष्णूपंत सोनवणी निफाड चे भूमीपूत्र सर्वोच्च न्यायालयाचे पहिले मराठी न्यायाधिश न्या.महादेव गोविंद रानडे यांच्या पुतळ्याचे पूजन नगरसेवक साहेबराव बर्डे, संदीप(बंटी)शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी वाचनालयाच्या वाटचालीत येणाऱ्या अडचणी व प्रगती विषयक माहिती उपस्थितांना दिली. सोसायटी संचालक शिवाजी ढेपले,नगरसेवक साहेबराव बर्डे,नगरसेवक संदीप शिंदे यांनी मनोगत व्यक्त करतांना ग्रामीण भागात या वाचनालयाने १०७ वर्षे पूर्ण केली व आपले वाचनालय सातत्याने अनेक कार्यक्रम राबवित आहे ही विशेष बाब असल्याचे नमूद करून वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**श्री माणकेश्वर वाचनालयाचा १०७ वा वर्धापन दिन मोठया उत्साहात साजरा**

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, सहचिटणीस राहूल दवते, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगांवकर, संचालक तन्वीर राजे,राजेंद्र खालकर, सुहास सुरळीकर,डॉ. महेश बनकर, सुनील चिखले,गुलाब टकले, श्याम गोळे, सुजाता तनपूरे, सभासद अशोक पगारे, संजय घुमरे,सुनील सोनवणे,प्रवीण तनपुरे,अण्णासाहेब बोरगुडे, राजेंद्र थोरात,विधिज्ञ प्रमोद आहेर, अनुरुप कुंभार्डे, ऋषिकेश वाघ,गणेश कापसे, राहुल नागरे, संपत धारराव, प्रफुल्ल कुलकर्णी, भरत निफाडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी निफाडच्या नगराध्यक्षपदी अरुंधती पवार यांची निवड झाल्याबद्दल वाचनालयाच्या वतीने अध्यक्ष मधुकरराव शेलार यांनी सत्कार केला. तसेच निफाड तालुका काँग्रेस अल्पसंख्यांक सेलच्या अध्यक्षपदी अन्वर शेख यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही वाचनालयाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.याप्रसंगी ग्रंथपाल नितीन बनसोडे, कर्मचारी नंदकुमार पुंड, अनिता इस्ते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक सुहास सुरळीकर यांनी तर आभार डॉ.महेश बनकर यांनी मानले

---

# आषाढी वारी कालावधीत अँटी ड्रोनगनचा वापर करणार : पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दिनांक २५ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी सोहळा पार पडत असून यासाठी राज्यभरातून पालख्या, वारकरी पायी चालत पंढरपूर कडे येत असतात या पालखी सोहळ्याचे व पंढरपूर येथील वारी सोहळ्याचे चित्रण करण्यासाठी काही खाजगी ड्रोन आकाशात गिरट्या घालत असतात. या माध्यमातून वारकरी यांच्या जीवितस कोणताही धोका निर्माण होऊ नये म्हणून यावर्षी माननीय श्री अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या संकल्पनेतून अँटी ड्रोन सिस्टम वापरण्यात येणार आहे. सदर सिस्टम कशा प्रकारे काम करते, त्याचे कार्य काय, त्याचा वापर कसा करावा याबाबत आज पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथील परेड मैदानावर प्रात्यक्षिक करण्यात आले.



त्यावेळी माननीय श्री अतुल कुलकर्णी यांनी पोलीस खात्यात आवश्यक असणाऱ्या गोष्टीबाबत संबंधित यांना सूचना दिल्या.

---

# पोलीस उपअधीक्षक संतोष गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत चपळगांव येथे शैक्षणिक साहित्य वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कर्तव्यदक्ष रॉयल डॅशिंग उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर ग्रामीण (DYSP) व आमचे मार्गदर्शक आधारस्तंभ पोलीस खात्यातील आदर्श व्यक्तिमत्व खात्यातील देवमाणूस आदरणीय पोलीस उपअधीक्षक श्री संतोष जी गायकवाड साहेब त्यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत चप्पळगांव येथे शैक्षणिक साहित्य वाटप व वृक्षारोपण समारंभ कार्यक्रम आयोजक शिवम्मा प्रतिष्ठान कडून करण्यात आले होते. यावेळेस प्रमुख उपस्थिती चप्पळगांवाचे सरपंच वर्षाताई भंडारकवठे पोलीस पाटील, विवेक चिदानंद हिरेमठ सर, उपसरपंच गणेश कोळी, राजू कोळी, रामचंद्र विजापूर सर, आंदाप्पा बंडगर काका, खाजप्पा गजधाने (तात्या), राजू (अजय देवगण) गजधाने, जयभिम (बाळा) गजधाने, कमलाकर जैनजांगडे, प्रविण गजधाने, संतोष गजधाने, बाबुलाल शेख, मित्र महिबूब तांबोळी, सलीम पटेल, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र मुख्याध्यापक सतीश वाले सर व शेळके सर व सचिन म्हेत्रे पत्रकार अल्लाउद्दीन फुलारी भाई व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

---

**पोलीस व परिवहन विभागाची संयुक्त कारवाई**

**४ लाख १० हजार ७०० रुपयांचा दंड वसूल**

# अनधिकृत व नियमबाह्य पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या रिक्षांवर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुध्द एकादशी दि.२५ जुलै २०२५ रोजी असून, यात्रा कालवधी १५ ते २९ जुलै असा असून श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी १८ ते २० लाख भाविक पंढरपूरात येतात. या कालावधीत पंढरपूर शहरातील विविध भागातून भाविकांची रिक्षातून वाहतुक करण्यात येते. भाविकांच्या सुरक्षेसाठी अनधिकृत व नियमबाह्य पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या रिक्षांना आवर घालण्यासाठी ६१ रिक्षांवर कारवाई करुन ४ लाख १० हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.





पोलीस व परिवहन विभागाची संयुक्त तपासणी मोहिमेत कारवाई ११५ रिक्षांची तपासणी केली. यामध्ये ६१ रिक्षावर कार्यवाही करण्यात आली असून यापैकी ११ रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. पंढरपूरात येणाऱ्या भाविक व वारकऱ्यांची वाहतूक व्यवस्था सुरक्षित, सुलभ आणि सुविहित ठेवण्यासाठी तसेच क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक व निश्चित केलेल्या दरांपेक्षा भाविकांकडून जास्त भाडे आकारणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई करण्यासाठी परिवहन विभागाकडून पथके नेमण्यात आली आहेत. पंढरपूर शहर व परिसरात धावणाऱ्या ऑटो रिक्षांवर संयुक्त तपासणी मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती मोटार वाहन निरीक्षक संतोष झगडे यांनी दिली.

रिक्षा चालकांवर वैध चालक परवाना व परमिट नसताना प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार आहे. रिक्षा चालकांनी वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र, विमा आणि चालक परवाना सोबत बाळगणे बंधनकारक आहे. तसेच, निश्चित केलेले भाडेपत्रक प्रवाशांना स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावावे असे आवाहन मोटार वाहन निरीक्षक श्री झगडे यांनी केले आहे.

सदरची कारवाई सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.नेरपगार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सहाय्यक प्रादेशिक परिवहन श्री.मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली परिवहन अधिकारी स्वप्निल गिरी , मोटार वाहन निरीक्षक राजन सरदेसाई, श्रेयस सरागे, नितीन गायकवाड,सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विक्रांत होनमोरे, प्रतीक्षा नारायणकर,भाग्यश्री रोडगे,कोमल डांगे हनुमंत गेळे, सागर नलावडे तसेच पंढरपूर शहर पोलीस कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आली.

---

# कल्याण तालुक्यातील म्हारळगावात महावितरणच्या कंत्राटी कामगाराचा विजेचा धक्का लागून मृत्यू; गावात शोककळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

म्हारळगाव, ता. कल्याण प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : कल्याण तालुक्यातील म्हारळगाव येथे महावितरणच्या कंत्राटी कामगार दीपक शेळके यांचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली असून, संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.



मृत दीपक शेळके यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या आरोपानुसार, महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांचा फोन आल्यानंतर वीजपुरवठा सुरू करण्यासाठी त्यांना तातडीने घटनास्थळी जाण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार ते कामासाठी गेले. मात्र, विद्युत खांबावर चढत असताना त्यांना अचानक विजेचा जोरदार धक्का बसला. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेनंतर म्हारळगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून, कुटुंबीयांनी महावितरण प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच मृताच्या कुटुंबाला योग्य आर्थिक मदत, नोकरी आणि न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.